**L. A. BILL No. LXXIX OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५९ चा ३. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



(शा.म.मु.) एचबी ८७७—१ (१०४५—७ -२०२५ )

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १७६ ची सुधारणा.

१९५९ चा ३.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) कलम १७६ मध्ये,-

(अ) पोट-कलम (५) मधील, “ ( पोट -कलम (२) च्या खंड (सव्वीस) अन्वये केलेल्या नियमांव्यतिरिक्त)” हा मजकूर वगळण्यात येईल आणि तो, १५ ऑगस्ट १९७५ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ब) पोट-कलम (६) वगळण्यात येईल आणि ते, १५ ऑगस्ट १९७५ पासून वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**३.** मुख्य अधिनियमात अथवा कोणत्याही न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा मुख्य अधिनियमाच्या कलम १७६ च्या पोट-कलम (६) अन्वये प्राथमिक नियम राज्य विधानमंडळासमोर न मांडता, मुख्य अधिनियमाच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (सव्वीस) अन्वये कोणताही नियम करण्यात आला असेल त्या बाबतीत, तो नियम, कायद्यानुसार वैधपणे करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीच वैध असल्याचे व अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्या अन्वये केलेल्या अशा कोणत्याही नियमांना किंवा कोणत्याही अधिसूचनांना किंवा आदेशांना, मुख्य अधिनियमाच्या कलम १७६ च्या पोट-कलम (६) च्या तरतुदींचे पालन करण्यात आलेले नाही केवळ या कारणावरून कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

पंचायती ह्या, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ब अन्वये घटित करण्यात आलेल्या ग्रामीण क्षेत्रांच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याचे कलम १२४ हे, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येतील अशा, किमान व कमाल दरांस अधीन राहून आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा सुटींस अधीन राहून, कर व शुल्क बसविण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस प्रदान करते.

२. कर व शुल्क हे, ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम १२४ अन्वये केलेले कर व शुल्क यासंबंधीचे प्रारूप नियम, अंतिम स्वरुपात प्रसिद्ध करण्यापूर्वी ते राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याच्या तरतुदी कलम १७६ च्या पोट-कलम (६) मध्ये अंतर्भूत असल्यामुळे अशा नियमांची अंमलबजावणी लांबणीवर पडते याचा परिणाम, पंचायतींच्या कर व शुल्क यांच्या वसुलीवर आणि अंतिमतः पंचायतींच्या उत्पन्नावर होऊ शकतो. म्हणून, असे नियम केल्यानंतर, उक्त अधिनियमान्वये केलेल्या इतर नियमांप्रमाणे, ते, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येतील अशी तरतूद करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. वरील प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १७६ मध्ये, भूतलक्षी प्रभावाने, सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ११ जुलै, २०२५.

**जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.

**सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक ७९– महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यातील उतारे.)**

**(सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम ३.)**

**१.** ते **१६८ख.** ** ** **

**१७६.** (१) ते (४) ** ** ** नियम.

(५) या कलमाअन्वये करण्यात आलेल्या प्रत्येक नियम पोट-कलम (२) च्या खंड (सव्वीस) अन्वये केलेल्या नियमांव्यतिरिक्त तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूवी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच तो नियम अंमलात येईल किंवा, यथास्थिति, येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमाअन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(६) पोट-कलम (२), खंड (सव्वीस) अन्वये केलेल्या प्रत्येक नियमाचा मसुदा, पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे **राजपत्राच** प्रसिद्ध करण्यात आल्यावर लगेच, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि तो पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, तो अंतिमरीत्या प्रसिद्ध करण्यापूर्वी राज्य विधानमंडळाकडून करण्यात येतील अशा फेरबदलांच्या अधीन असेल.

**१७७.** ते **१८८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९. ]**

**[ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.